


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २९९● शुक्रवार,दि.३० जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955






## राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजित पवार अनंतात विलीन

पुणे । प्रतिनिधी

राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजित पवार अनंतात विलीन झाले आहेत. दादांना अखेरचा निरोप देण्यासाठी महाराष्ट्र लोटला होता. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अजित दादांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या दादाला निरोप देताना उपस्थित कार्यकर्त्यांनी अजित दादा अमर रहे च्या घोषणा दिल्या. देशाचे गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील सर्व वरिष्ठ नेते आणि अधिकारी उपस्थित होते. अंत्यसंस्कारावेळी कार्यकर्त्यांच्या अश्रुंचा बांध फुटला त्यांनी 'परत परत या अजित दादा परत या' अशी घोषणाबाजी केली. अजित दादा यांचे पार्थिव




● अजित पवार यांच्या अचानक निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या धक्क्याने सर्वच जण हादरले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह देशभरातील अनेक दिग्गजांनी अजित पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

सकाळी काटेवाडी येथील निवासस्थानी आणण्यात आले होते. बारामतीकरांनी काळजावर दगज ठेवत शेवटचं दर्शन घेतलं, त्यानंतर फुलांनी सजवलेल्या ट्रकमधून दादांची अंत्ययात्रा विद्या प्रतिष्ठानच्या मैदानाकडे नेण्यात आलेली, तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूल मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळाली. विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर लाखोंच्या संख्येने जनगसागर लोटल्याचं पाहायला मिळाला. पार्थ आणि जय पवार या दोघा पुत्रांनी दादांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला.





## कंठ दाटला, डोळ्यात धारा; अजितदादांना श्रद्धांजली वाहण्यासाठी अलोट जनसागर



अजित पवार.... म्हणायला गेलं तर एका नावातले हे दोन शब्द... पण या दोन शब्दांमध्ये काय काय सामावलं होतं ? हे आज बारामतीकरांनी सगळ्या जगाला दाखवून दिलं... अजितदादांचं अखेरचं दर्शन घेता यावं म्हणून बारामतीकर अक्षरशः धडपडत होता....अजित पवार पंचत्वात विलिन झालेत... पण कार्यकर्त्यांच्या अश्रूंचा बांध अजूनही सुरूच आहे... अजित पवारांच्या रूपात कुणी दादा गमावला, कुणी बापमाणूस गमावला तर कुणी आधारवड गमावलाय..

एरवी जनता दरबारासाठी... किंवा दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी... तर कधी अडलं-नडलेलं काम मार्गी लावण्यासाठी, कार्यकर्ते अजितदादांचं काटेवाडीतलं घर गाठायचे... मात्र आज गर्दी झाली होती ती लाडक्या अजितदादांचं अखेरचं दर्शन घेण्यासाठी... विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात अंत्यसंस्कार ▶ उर्वरित पान २ वर

# अजितदादांची राजकीय कारकीर्द : लोकसभेतून राजकारणात एंट्री, उपमुख्यमंत्री पदाचा विक्रम




महाराष्ट्राच्या राजकारणात आजची सकाळ सर्वात वाईट बातमी घेऊन आली. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा भीषण विमान अपघातात मृत्यू झाला. अजितदादांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राने एक उमदं नेतृत्व गमावलं. राजकारणातील दादा म्हणून त्यांचा सर्वांनाच आदरयुक्त धाक होता. दादा हे राजकारणातील धडाडीचं व्यक्तिमत्व होतं. काका शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी राजकीय धडे गिरवले. त्यांनी स्वतः ची एक वेगळी आणि खास ओळख निर्माण केली. गेल्या काही वर्षात तर त्यांनी वेगळी वाट चोखंदळत त्यांचं राजकीय अस्तित्वही दाखवून दिले. तर या महानगरपालिका निवडणुकीपासून दोन्ही राष्ट्रवादींची एकजूट आणि एकमोट बांधण्याचा त्यांचा प्रयत्नही दिसून येत होता. रोखठोक आणि वक्तशीर लोकनेत्याची अशी होती राजकीय कारकीर्द

## ● काकांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय धडे

अजितदादांचा जन्म हा अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यामधील देवळाली येथे २२ जुलै १९५९ रोजी झाला. १९८२ मध्ये त्यांनी स्थानिक राजकारणात प्रवेश केला. त्यांनी काका शरद पवार यांच्या नेतृत्वात राजकीय धडे गिरवायला सुरुवात केली. शरद पवार यांच्या अनेक निर्णयाचे ते साक्षीदार होते. शरद पवार यांच्यासोबत त्यांनी अनेक पदांवर काम केले. १९९३ साली शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री झाले. तेव्हा अजितदादांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले. त्यांनी वित्त, नियोजन, ऊर्जा, जलसंपदा, ग्रामीण विकास यासह अनेक खाती त्यांनी सांभाळली. त्याचवेळी शेती, सहकार आणि ग्रामीण भागाशी त्यांची मजबूत नाळ जोडल्या गेली. बारामतीच्या स्थानिक राजकारणासह राज्यातील अनेक जिल्ह्यांशी त्यांच्या थेट संबंध आला. काकांसारखेच ते कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांच्या कायम गराड्यात राहिले. भल्या पहाटे पासून काम करण्याची त्यांची सवय अनेकांना आश्चर्यचकीत करणारी होती. राजकारणात या पद्धतीने काम करणारे नेते फारच विरळ आहेत. दादांचा कामाचा झपाटा, उरक अनेकांना प्रेरणादायी होता. ते नेहमी भल्यामोठ्या फरकाने विजयी झाले आहेत.

## ● काकांसाठी अजितदादांचा खासदारकीचा राजीनामा

१९९१ साली अजितदादांना काँग्रेसने खासदारकीचं तिकीट दिलं. सर्व उमेदवारांची अगोदर घोषणा झाली. ऐन शेवटच्या टप्प्यात अजितदादांना खासदारकीची तिकीट देण्यात आलं. त्यावेळी पृथ्वीराज चव्हाण आणि अजितदादा पवार हे निवडून आले. पुढे हे दोघे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात एकत्रित होते. पण राजीव गांधी यांच्या हत्येनंतर पी.व्ही. नरसिंह राव यांच्याकडे देशाचे नेतृत्व आले. त्यांनी तातडीने शरद पवार यांना संरक्षण मंत्री पदाची जबाबदारी दिली. संसद सदस्यत्वासाठी मग बारामती मतदार संघ सुरक्षित होता. काकांसाठी दोन–तीन महिन्यांपूर्वी निवडून आलेले अजितदादा यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. त्यानंतर लागलीच त्यांनी विधानसभेची निवडणूक लढवली आणि ते विजयी झाले. त्यानंतर त्यांचा राज्यातील राजकीय झंझावात कमी झाला नाही. पुढे ३५ वर्षांहून अधिक काळ ते महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रीय होते. या काळात त्यांनी बारामती मतदारसंघाचं तीन दशकांहून अधिक काळ प्रतिनिधीत्व केलं.

## ● उपमुख्यमंत्री पदाचा रेकॉर्ड

१९९५, १९९९, २००४, २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ असे सलग त्यांनी बारामती मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. मंत्रिमंडळात कृषी आणि ऊर्जा राज्यमंत्री म्हणून काम केले. पाणी पुरवठा, नियोजन राज्यमंत्री, पाटबंधारे, फलोत्पादन, ग्रामीण विकास, पाणी पुरवठा आणि स्वच्छता, पाटबंधारे मंत्री, तर राज्याचे अर्थमंत्री त्यांची कारकीर्द उल्लेखनीय राहिली आहे. अजितदादांनी उपमुख्यमंत्री पदाचा रेकॉर्ड केला. ते सातवेळा उपमुख्यमंत्री झाल्याचा दावा करण्यात येतो. ते स्वतः आपण उपमुख्यमंत्री पदाचा रेकॉर्ड केल्याचे मिश्किल पणे म्हणायचे.



*तुमच्या धनंजयचा अखेरचा दंडवत दादा... महाराष्ट्राचा दादा माणूस आज अनंतात विलिन होताना अत्यंत जड अंतःकरणाने आदरांजली अर्पण केली. दादा आपल्यात नाहीत, यावर अजूनही विश्वास बसत नाही... तुमच्याविना पोरके, अपुरे आणि अर्धवट आहोत. नियती इतकी क्रूर कशी असू शकते? भावपूर्ण आदरांजली दादा... अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी त्यांचे नेते व आधारवड असलेल्या स्व. अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण वाहिली आहे.*



*अजित दादा परत या.. असं म्हणत कार्यकर्त्यांनी टाहो फोडला. साश्रू नयनांनी अजित पवार यांना अखेरचा निरोप देण्यात आला. गृहमंत्री अमित शहा यांच्यासह देशभरातील राजकीय पक्षांचे नेते या प्रसंगी उपस्थित राहिले. बारामती तालुक्यातील निरावागज, पणदरे, करंजेपूल (सोमेश्वर) आणि सुपा या गावात बुधवारी सकाळी अजितदादांच्या प्रचारसभांचं आयोजन करण्यात आलं होतं.*



*अजित पवारांना शेवटची श्रद्धांजली अर्पण करतांना मुख्यमंत्री – देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री – एकनाथ शिंदे*

◆ पान १ वरून पुढे...

## कंठ दाटला, ....

करण्याआधी, अजित पवारांचं पार्थिव काही वेळ त्यांच्या काटेवाडीतल्या घरात ठेवण्यात आलं होतं ज्या काटेवाडीच्या मातीनं अजित पवारांना लहानाचं मोठं केलं... आज तीच काठेवाडी धाय मोकलून रडत होती... कारण अजितदादांच्या रूपात त्यांनी आधारवड गमावलाय.... बारामतीचा असा एकही रस्ता नसेल जो अजितदादांच्या पायाखालून गेला नसेल... कधी प्रचारासाठी कधी विकासकामांच्या पाहणीसाठी... तर कधी कार्यकर्त्यांच्या घरातील सुख–दुखाच्या प्रसंगात सहभागी होण्यासाठी पायाला भिंगरी लावून अजित पवारांनी बारामती कितीवेळा पालथी घातली असेल याची गणनाच नाही... मात्र त्याच बारामतीच्या रस्त्यावरून अजित पवारांचा आज अखेरचा प्रवास पाहताना, हजारो बारामतीकरांच्या डोळ्यात पाणी उभं राहिलं होतं.. स्वच्छतेसाठी आग्रही असणाऱ्या अजितदादांचा, विद्या प्रतिष्ठानमधील सफाई कर्मचाऱ्यांनी अनेकवेळा ओरडा खाल्लाय... मात्र आता जाब विचारणारा आवाजच काळाच्या पडद्याआड हरवाय .बारामतीत असताना अजितदादांचा विद्या प्रतिष्ठानमधला फेरफटका कधीच चुकला नाही... मात्र त्याच विद्या प्रतिष्ठानच्या कुशीत अजितदादा कायमचे विसवणार होते... अजितदादांना निरोप देण्यासाठी बारामती विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात लोटली होती. ज्या नेत्याची राजकीय उंची जास्त, त्या नेत्याच्या राजकीय शत्रूंची संख्याही तेवढीच जास्त... मात्र अजितदादा याला अपवाद ठरले... मैत्रीत त्यांनी राजकारण कधीच आड येऊ दिलं नाही... म्हणूनच अजित पवारांना अखेरचा निरोप देण्यासाठी सगळ्याच पक्षातले नेते आवर्जून उपस्थित होते... ट्रिपल इंजिन सरकारमधलं एक इंजिन आता कायमचं थांबलंय अजित पवारांच्या रूपात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकारमधला एक महत्त्वाचा शिलेदार गमावलाय... आणि या शिलेदाराला अखेरचा निरोप देताना या दोन्ही नेत्यांच्या डोळ्यासमोरून अजितदादांच्या कित्येक आठवणी नक्कीच तरळल्या असणार.. महाराष्ट्राचे लाडके दादा असणाऱ्या अजित पवारांना अखेरचा निरोप देताना, घरातल्या बहिणींना अश्रू अनावर झाले होते... ज्यानं आयुष्यातली सगळी संकट ढाल म्हणून झेलली... आयुष्याच्या सुख–दुखात ज्या खांद्याचा सदैव आधार होता... तो बापमाणूस गमवल्यानंतर जय आणि पार्थ पवार यांच्यावर किती मोठा दुः खाचा डोंगर कोसळला असेल... हे शब्दात मांडता येणार नाही.. आजवरचं सगळं आयुष्य ज्यांची सावली म्हणून वावरली... तो प्रकाशच का हिरावून नेलास ? असा प्रश्न निशब्द झालेल्या सुनेत्रा पवार नक्कीच विचारत असणार.. बाहेरून दिसत नसलं तरी शरद पवार नावाचा वटवृक्ष देखील आतून नक्कीच कोलमडला होता.... कारण त्याच्या सावलीत वाढलेलं, बहरलेलं एक मोठं झाडं उन्मळून पडलं होतं.. पवार कुटुंबाचा... राजकीय मित्रमंडळीचा.... लाडक्या समर्थकांचा.. आणि बारामतीकरांचा, अखेरचा निरोप घेऊन अजितदादा बारामतीच्याच कुशीत कायमचे विसावले.

## पाटोदयात उपमुख्यमंत्री...

कौतुकास्पद होती. महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेत त्यांचे योगदान मोठे आहे. आज एका कार्यक्षम नेतृत्वाचा असा निरोप घेणे मनाला चटका लावून जाणारे आहे.सौ. दिपाली जाधव (नगराध्यक्षा, पाटोदा) दादांनी नेहमीच शहराच्या विकासासाठी झुकते माप दिले. कामाची शिस्त आणि स्पष्टवक्तेपणा ही त्यांची ओळख होती.त्यांच्या जाण्याने पाटोद्याच्या विकास हरपला आहे.बाबुराव जाधव (नगरसेवक): सामान्य कार्यकर्त्याला बळ देणारा हा महान नेता होता. प्रशासनावरील पकड आणि लोकांच्या

◆ पान ४ वरून पुढे...

प्रश्नांची जाण यामुळे त्यांनी प्रत्येकाच्या मनात स्थान निर्माण केले होते या श्रद्धांजली सभेला पाटोदा शहरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी विविध संघटनेचे प्रतिनिधी,विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनीही आपल्या श्रद्धांजलीपर भावना व्यक्त केल्या यावेळी मोठ्या संख्येने पाटोदेकर, विविध पक्षाचे नेते,सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार,व्यापारी बांधव उपस्थित होते. सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून लाडक्या नेतृत्वाला आदरांजली वाहिली. पाटोदा तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून यावेळी मोठी हळहळ व्यक्त करण्यात आली.

## पिंपळनेर पोलीस...

मुद्देमाल जप्त करण्यात आला. पंचनामा करून सदर वाहन व वाळू पिंपळनेर पोलीस ठाणे आवारात सुरक्षित ठेवण्यात आली आहे. या प्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १८/२०२६ अन्वये आरोपीविरुद्ध कलम ३०३(२) BNS तसेच मोटार वाहन कायदा कलम १३०/१७७, ३९/१९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा पवार, यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे, पोलीस अंमलदार सादीक पठाण, सोनवणे, पवार यांनी केली आहे.

## अंबाजोगाईत 1...

हे शिबीर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतिश सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ , अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिक्कारी डॉ. शेख रौफ, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. सचिन शेकडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.एल आर तांदळे,तसेच महाराष्ट्र राज्य आय.एम.ए चे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी , सचिव डॉ. विक्रांत देसाई , कोषाध्यक्ष डॉ.अमोल गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. शिबीरातील तपासण्या व उपचार : या शिबिरात नवजात बालक ते १८ वर्षापर्यंतच्या सर्व बालकाची मोफत २ डी इको कार्डीओग्राफी व कलर डॉपलर तपासणी. सर्व प्रकारच्या बालकांमधील हृदयरोगासंबंधी आजारांचे निदान, उपचार व सल्ला. या पुर्वी ऑपरेशन झालेल्या सर्व बालकांची मोफत फेर तपासणी व पुढील सल्ला. ऑपरेशन्स करण्याची आवश्यकता असणाऱ्या सर्व बालकाची लिटल हार्ट केअर हॉस्पिटल, पुणे येथे विविध योजनेच्या माध्यमातून मोफत ऑपरेशन करण्यात येतील.खालील लक्षणे असणाऱ्या बालकांची तपासणी करण्यात येईल: बाळ निळसर पडणे, बाळाचे वजन न वाढणे, जोरा जोरात श्वास घेणे,बाळ दुध व्यवस्थित न पिणे, दुध पिताना कपाळावर घाम येणे,बाळाला धाप लागणे, वांरवार निमोनिया होणे, या पैकी कोणतेही लक्षणे किंवा ए.एस.डी.,व्ही.एस.डी., पी.डी.ए, जन्मतः असणारे हृदयांचे आजार या संदर्भात लक्षणेअसल्यास या शिबीरामध्ये तपासणी करुण घ्यावी.शिबीरास येतांना सर्व जुने रिपोर्टस घेवून यावे. तरी या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी,धनराज सोळंकी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बालासाहेब लोमटे, डॉ. श्रीनिवास, रेड्डी, डॉ.सचिन पोतदार, डॉ.अतुल शिंदे, प्रा.संतोष मोहिते, अविनाश मुडेगावकर,कल्याण काळे, बालाजी घाडगे,राधेश्याम लोहिया यांनी केले आहे. तरी गरजू रुग्णांच्या नातेवाईकांनी पुढील मोबाईल क्रमांकावर ९५२९७५३७५४ नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## धनंजय मुंडेंच्या....

करण्याच्या सूचना दिल्या असून, संबंधितास लवकरच अटक करून योग्य कारवाई करण्याचे आश्वासन श्री. नवनीत कावत यांनी दिले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

धनंजय मुंडे यांच्या नावाने चालवण्यात येणारे सदरील खाते हे बनावट असून कुणीतरी जाणीवपूर्वक बदनामी करण्याच्या उद्देशाने सुरू केले असून, संबंधित खात्याचा किंवा त्यावरील पोस्टचा आमच्याशी कोणताही संबंध नसून त्यावरून करण्यात येणाऱ्या आक्षेपार्ह पोस्टची जबाबदारी ही संबंधित फेक खाते धारकाची असल्याचे श्री. सांगळे यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले आहे. सायबर विभागाच्या कार्यपद्धतीनुसार संबंधित अज्ञात खाते धारका विरोधात प्राप्त फिर्यादीवरून भारतीय दंड संहितेच्या माहिती तंत्रज्ञान कायदा तसेच लोकप्रतिनिधींच्या नावाने खोटे खाते उघडून त्यावरून बदनामी केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करून तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक श्री. निलेश केळे यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान सदर फेसबुक खाते saurabhshelke1@gmail.com या इमेल आयडी वरून कुणीतरी शेळके नामक व्यक्ती चालवत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून सायबर पोलिस अधिक तपास करत आहेत. असे खाते उघडून आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर कारवाई करणार– धनंजय मुंडे यांचे खाते असल्याचे भासवून बनावट खाते तयार करून किंवा धनंजय मुंडे यांचे नाव वापरून आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात येईल, त्यामुळे असे खाते कुणी चालवत असल्यास तत्काळ त्यावरील पोस्ट डिलिट करून संबंधित खाते तत्काळ बंद करावेत, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असे आवाहन श्री. धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## पाटोदा–मांजरसुंबा...

या अपघातात संतोष मधुकर कागदे वय ४२ वर्षे (रा. मोरगाव, ता. व जि. बीड) यांचा मृत्यू झाला. ते दुचाकीवरून प्रवास करत असताना हा अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार ट्रक क्रमांक एम एच १२ एच डी १५१४ आणि दुचाकी क्रमांक एम एच १२ ए एल ८५६१ यांच्यात जोरदार धडक झाली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार धडक अत्यंत भीषण होती. अपघातात संतोष कागदे यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलीस प्रशासनास कळविण्यात आले. त्यानंतर लिंबागणेश पोलीस चौकीचे पोह. मन्सूर शेख, पोशि. बाबासाहेब खाडे व पोशि. अब्दुल सय्यद हे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलीस व रुग्णवाहिकेच्या मदतीने मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी बीड जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून पुढील तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू आहे. दरम्यान, या महामार्गावर वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांमध्ये भीती व चिंतेचे वातावरण आहे. प्रशासनाने या मार्गावर वाहतूक सुरक्षेसाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक व ग्रामस्थांकडून होत आहे.

## महाराष्ट्र पत्रकार...

शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन येथे होणार आहे यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शिरीष कुलकर्णी साहेब पुणे हे असणार आहेत तर उद्घाटक म्हणून गेवराईचे डीवाय.एस.पी. अनिल कटके उपस्थित राहणार आहेत प्रमुख गेवराई मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित माजी मंत्री बदामराव पंडित, भाजपा नेते बाळराजे पवार उपस्थित राहणार आहेत तर पुरस्कार वितरक म्हणून गेवराई तालुक्याचे तहसीलदार श्री खोमणे साहेब, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप साहेब झुंजार सेनापतीचे संपादक सोमनाथ पाटील असतील या सह अनेक प्रमुख उपस्थित पाहुण्यांच्या उपस्थितीत हा मूकनायक पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे तरी हितचिंतक कार्यकर्ते वाचक यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब हुंबरे यांच्यासह माजलगाव तालुकाध्यक्ष संतोष रासवे व बालासाहेब उफाडे यांनी केले आहे

◆ पान ४ वरून पुढे...

## द्वारकाधीश मित्र मंडळाचा...

शिबिर २४,२५ आणि २६ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात आले. या शिबिरास मोठा प्रतिसाद नागरिकांनी दिल्याचे दिसून आले. सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वेळ असतानाही तुम्ही दिवस रात्री उशिरा पर्यंत नागरिकांनी या शिबिरात नोंदणीसाठी गर्दी केली होती. शिबिरात तीन दिवसात अठराशे सताविस पेक्षा अधिक नागरिकांनी आपली नोंदणी केली असून या सर्व नागरिकांना आयुष्यमान भारत योजना चे कार्ड देण्यात आले आहे. या योजने अंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य खर्च मोफत मिळणार असल्याने नागरिकांना याचा मोठा लाभ होणार आहे. १८०० नागरिकांना प्रत्येकी पाच लाखाचे मोफत आरोग्य कवच मिळणार असल्याने तीन दिवसात तब्बल ९० कोटी रुपयांचा लाभ या नागरिकाचा होणार आहे. द्वारकाधीश मित्र मंडळाने या आधी देखील पंतप्रधान आवास घरकुल योजना मा, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना करोणा लॉक डाऊन मध्ये मध्यवर्ती लोकांना दोन वेळेस घरपोच डबे देण्यात आले परशुरामभैय्या गुरखुदे यांच्या जन्मदिनी दरवर्षी रक्तदान शिबिर घेण्यात येत आहे असे सातत्याने असे अनेक सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत त्याचा नागरिकांना लाभ झाला असून या आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमातून आणखी एक विक्रमी उपक्रम द्वारकाधीश मित्र मंडळाने केल्याने नागरिकांतून कौतुक केले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशवासियांसाठी कल्याणाच्या विविध योजना सुरू केल्या असून त्या सर्वांपर्यंत पोहचवण्यासाठी द्वारकाधीश मित्र मंडळ, परशुराम भैय्या नगर सेवक जगदीश गुरखुदे आणि सौ. भाग्यश्री सागर देशपांडे हे आणि शेख आयास, ड.अक्षय कुलकर्णी ,रोहित कुलकर्णी ,शेख गुड्डू ,अक्षय देशपांडे ,कुमार दोडके, राजा शेख ,ओमकार राऊतमारे ,अशोक नरवडे ,लल्या जोशी ,गोकुळ वनवे ,सरडे, दिनेश शिंदे,जगदीश आनेराव, आकाश जवकर ,गणेश काळे ,मंदार देशपांडे ,गौरव वाजपेयी ,सुरज वखरे व सर्व द्वारकाधीश मित्र मंडळ परिश्रम घेत आहेत. असेच उपक्रम सर्व नगर सेवकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी शहरात घेतल्यास त्याचा सर्वसामान्य नागरिकांना फायदा होईल.

## व्यक्तिमत्व विकास....

केले. आपली भाषा व संस्कृती नष्ट होऊ नये यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. शब्दाची ताकद प्रत्येकाने ओळखणे गरजेचे असून समाजामध्ये सकारात्मक बदल घडविण्यामध्ये याचा खूप मोठा उपयोग होतो. भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात प्राचीन संस्कृती असून संपूर्ण जगासाठी ती आदर्शवत व प्रेरणादायी ठरली आहे. विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेचा उपयोग करून समाजात बदल घडविण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणे आज आवश्यक ठरले आहे. प्र के अत्रे यांच्या मुरलीवाला कवितेतून सर्जनशीलता अतिशय चांगल्या प्रकारे चित्रित केली आहे. आज विद्यार्थ्यांमध्ये वाचनाचे महत्त्व कमी होत चालले असून सोशल मीडियाच्या प्रभावामुळे विद्यार्थी ग्रंथालयाकडे जात नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले असून वाचाल तर वाचाल ही उक्ती त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनात अंगीकारली. डॉ आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेऊन समाज परिवर्तनात हातभार लावावा असे आव्हान केले होते. विद्यार्थ्यांनी महापुरुषांची चरित्रे वाचून आपला व्यक्तिमत्व विकास घडविण्याबरोबरच समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो ही भावना सदैव मनाशी बाळगावी. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासाबरोबरच समाज व समाजातील प्रत्येक घटकांशी कशा प्रकारे वागावे हे शिकविते समाजामध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे हेच खरे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य आहे असे त्या शेवटी म्हणाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनएसएस विभागप्रमुख डॉ. अरुण राख, सुत्रसंचालन डॉ. वैशाली आहेर तर आभार प्रा. आनंद घोंगडे यांनी मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जिल्हा परिषदेच्या धोकादायक शाळांपासून विद्यार्थ्यांना मुक्ति देण्यासाठी...
# 15 कोटींची मागणी केल्यानंतर तब्बल 30 कोटींचा भरभरून निधी देणारे पालकत्व हरपले : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून अनेक शाळा मोडकळीस आलेल्या व धोकादायक स्थितीत आहेत. जिल्ह्यातील ९४ शाळांकडे स्वतःची इमारत नाही, तर ३८१ शाळांमधील ६०७ वर्गखोल्यांना तातडीच्या दुरुस्तीची आवश्यकता आहे. पावसाळ्यात छप्पर कोसळणे, भिंती पडणे आणि विद्यार्थ्यांना इजा होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत.




**आता अजितदादांच्या जाण्याने शालेय विद्यार्थ्यांच्या डोक्यावरून मदतीचा आधार उठल्याची भावना निर्माण झाली आहे. बीडसाठी भरभरून मदत करणाऱ्या पालकत्वाला भावपूर्ण श्रद्धांजली – अशी भावना डॉ. ढवळे यांनी व्यक्त केली.**

सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यासंदर्भात जिल्हा प्रशासनाकडे निवेदने व आंदोलनांद्वारे सातत्याने निधीची मागणी केली होती. त्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा नियोजनमधून १४ कोटी ८५ लाख रुपयांची मागणी केली होती; मात्र दोन वर्षे निधी मंजूर होत नव्हता. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार बीडचे पालकमंत्री झाल्यानंतर, डॉ. ढवळे यांनी सातत्याने लक्ष्यवेधी आंदोलने करत निधीची मागणी लावून धरली. याची दखल घेत पालकमंत्री अजितदादा पवार यांनी शाळा खोल्यांच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी रुपये, नवीन शाळा इमारत बांधकामासाठी १६ कोटी ५० लाख रुपये अशी तरतूद मंजूर केली.

नियमानुसार दीडपट कामे हाती घेतली जाणार असल्याने एकूण २९ कोटी ७५ लाख रुपयांचा खर्च करून दुरुस्ती व नवीन बांधकाम सुरू होणार आहे. त्यामुळे शाळांच्या मुलभूत सुविधांसाठी केवळ १५ कोटींची मागणी असतानाही तब्बल दुप्पट म्हणजे जवळपास ३० कोटींचा निधी मंजूर करणारे पालकत्व आता हरपल्याची भावना डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली. बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार हे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील असल्याचा अनुभव असल्यामुळेच बीड तालुक्यातील परभणी केसापुरी गावातील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता ६ वी वर्गातील अंकीता कवचट हिने थेट पालकमंत्री अजित पवार यांना अजितकाका संबोधत लेखी पत्राद्वारे पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वर्गखोल्यांची अवस्था व शैक्षणिक साहित्याबाबत मदतीची अपेक्षा व्यक्त केली होती.

## श्री श्री राधागोविंद मंदिराच्या २३ व्या वर्धापन दिनानिमित्त प.पू.लोकनाथ स्वामी महाराज यांची उपस्थिती



**बीड । प्रतिनिधी**

संत सावता माळी चौक बीड येथील श्री श्री राधा गोविंद मंदिराच्या (इस्कॉन बीड) २३ व्या वर्धापन दिनानिमित्त रविवार दि.१ फेब्रुवारी २०२६ इस्कॉनचे वरिष्ठ संन्याशी प.पू.लोकनाथ स्वामी महाराज यांची दिव्य उपस्थिती लाभणार आहे. लोकनाथ स्वामी महाराज हे इस्कॉन संस्थापकाचार्य कृष्णकृपामूर्ती ए.सी.भक्ती वेदांत स्वामी श्रील प्रभुपाद यांचे प्रिय शिष्य आहेत. लोकनाथ स्वामी महाराज हे संपूर्ण जगभर कृष्णभक्तीचा प्रचार व प्रसार करीत आहेत. तसेच मॉरिशीयस इस्कॉनचे संन्यासी प.पू. सुंदरचैतन्य महाराज यांची देखील उपस्थिती लाभणार आहे. वर्धापन दिनानिमित्त सकाळी ९ ते दुपारी १ या दरम्यान श्री श्री राधागोविंद देवांचा अभिषेक, पुष्पाभिषेक, भजन, प्रवचन, महाआरती संपून्न होणार आहे. तसेच दुपारी १ ते ३ पर्यंत महाप्रसादाचे आयोजन

## ४६ वे विभागीय वार्षिक पुष्पप्रदर्शन १४ व १५ फेब्रुवारीला छत्रपती संभाजीनगरमध्ये

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या उपवने व उद्याने विभागाच्या वतीने तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने ४६ वे विभागीय वार्षिक पुष्पप्रदर्शन येत्या १४ व १५ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे. हे भव्य पुष्पप्रदर्शन कौटुंबिक न्यायालय, जुने उच्च न्यायालय आवार, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडणार आहे. या पुष्पप्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या फुलांचे आकर्षक प्रदर्शन, सजावटीची फुलझाडे, उद्यान स्पर्धा तसेच उद्यान प्रेमींसाठी मार्गदर्शनपर उपक्रमांचा समावेश असणार आहे. उद्यानप्रेमी नागरिक व इच्छुक स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपवने व उद्याने छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहायक संचालक श्री. प्रसाद कडुलकर यांनी केले आहे. पुष्पप्रदर्शन स्पर्धे साठी प्रवेशपत्रिका देण्याचा व स्वीकारण्याचा कालावधी ३ ते १२ फेब्रुवारी २०२६ (कार्यालयीन वेळेत) असा राहणार आहे. तर उद्यान स्पर्धेसाठी प्रवेशपत्रिका ३ ते ९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत स्वीकारण्यात येणार आहेत. उद्यान स्पर्धा या उद्यानाचा प्रकार व आकार (क्षेत्रफळ) यानुसार विविध गटांमध्ये घेण्यात येणार असून, स्पर्धेत सहभागी झालेल्या उद्यानांचे परीक्षण १० व ११ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात येणार आहे. त्यानुसार स्पर्धकांनी आपल्या उद्यानांची तयारी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेशपत्रिका सहायक संचालक, उपवने व उद्याने यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मध्यवर्ती इमारत (विस्तार), अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर येथे उपलब्ध असून, याच ठिकाणी प्रवेशपत्रिकांचा स्वीकारही करण्यात येणार आहे. पुष्पप्रदर्शनाबाबत अधिक माहितीसाठी सहायक संचालक श्री. प्रसाद कडुलकर (मो. ८१६९३५४९९५) तसेच श्री. बालाजी जवळे, उद्यान पर्यवेक्षक (मो. ८३९००९६६९८) यांच्याशी संपर्क साधावा,

## जिल्हा परिषद येवलवाडी शाळा येथे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली



**पाटोदा । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येवलवाडी येथे ग्रामपंचायत व शाळेच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमात सरपंच किशोर नागरगोजे यांच्या उपस्थितीत ग्रामस्थ, शालेय शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.यावेळी सतीश नागरगोजे,गोकुळ नागरगोजे,गणेश नागरगोजे, तसेच नागरगोजे सर, कुंभार सर उपस्थित होते. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत नेत्यांना श्रद्धांजली वाहिली. कार्यक्रमात अजित दादा पवार यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा उल्लेख करण्यात आला. विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत आदरांजली अर्पण केली. कार्यक्रम शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

## मुक्त पत्रकार डी.जी. वानखेडे यांना पत्रकार संघाचा मूकनायक पुरस्कार जाहीर
## ३१ जानेवारी रोजी मूकनायक दिनी जाहीर कार्यक्रमात होणार वितरण

**बीड । प्रतिनिधी**



सेवानिवृत्त प्रयोगशाळा तंत्रज्ञ तथा ज्येष्ठ मुक्त पत्रकार डी. जी. वानखेडे यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचा मूकनायक २०२६ हा सन्मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार मूकनायक दिन समारंभामध्ये सन्मानपत्र देऊन गौरवण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने बीड येथील ज्येष्ठ मुक्त पत्रकार डी. जी. वानखेडे यांचे अविरत जनहितार्थ सुरू असलेले सेवा कार्य लक्षात घेऊन त्यांना ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता मूकनायक दिन समारंभ कार्यक्रमांमध्ये सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त सीईओ पी व्ही बनसोडे लाभणार असून अनेक मान्यवर संपादक, पत्रकार आणि प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीमध्ये हा गुणगौरव सोहळा तुलसी संगणक कॉलेज सभागृह, आदर्श नगर, डीपी रोड बीड येथे आयोजित करण्यात आला आहे.

## तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट शाळेमध्ये स्नेहसंमेलन व पालक मेळावा उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट तालुका बीड या शाळेमध्ये आज सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला त्याचबरोबर पालक मेळाव्याचे देखील आयोजन करण्यात आले होते.



## शिवाजीराव चिकणे यांच्या भाजपा प्रवेशाने गंगावाडीसह गोदाकाठ भाजपामय !



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा गावा पासुन अवघ्या हाकेच्या अंतरावर आसलल्या गोदाकाठच्या गंगावाडी गावातील सर्व समावेशक आसलेला चेहरा शिवाजीराव चिकणे यांचा जवळपास शभरच्यावर कार्यकर्त्यासह गंगावाडी येथे विविध मान्यवराच्या उपस्थितीत भाजपा पक्षात प्रवेश झाला असुन गेवराई तालुक्याचे सर्व समावेशक नेतृत्व बाळराजे पवार यांच्या उपस्थितीत दिनांक २७/१/२०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता गंगावाडी पंचक्रोशीत हा प्रवेश सोहळा आयोजित करण्यात आलेला होता. तलवाडा व तलवाडा पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी बहु संख्यने उपस्थित दर्शविली. शिवाजीराव चिकणे हे गंगावाडी गावचे रहिवाशी आसले तरी तलवाडा पंचक्रोशीसह गोदाकाठच्या सर्व गावा मध्ये त्यांचे हृदय स्पर्शी जिव्हाळ्याचे संपर्क जोडलेले आसल्याने त्यांच्या भाजपा प्रवेशाने गोदाकाठी मोठ्या प्रमाणात राजकीय बदलाव होण्याची शक्यता या निमित्ताने वर्तवली जात आहे. शिवाजीराव चिकणे व त्याच्या आणुयायांच्या झालेल्या भाजपा प्रवेश सोहळ्यास तलवाडा पंचायत समिति दोन्ही गणातील व जि.प. गटातील भाजपा प्रेमी पदाधिकाऱ्यांनी जास्तीच्या संख्येने मोठ्या प्रमाणात या प्रवेश सोहळ्यानिमित्त उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवली आसल्याचे या वेळी दिसुन आले. शिवाजीराव चिकणे यांच्या भाजपा प्रवेशाने गंगावाडी सह संपूर्ण गोदाकाठ भाजपामय झाल्याची स्थिति तलवाडा जि.प. गटात दिसुन येत आहे.

## १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कार्यक्रम: छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालय राज्यात दुसरे

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले. या मूल्यमापनात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयात ई-गव्हर्नन्स उपक्रमांची नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्यात आली. विभागनिहाय सातत्यपूर्ण आढावा, ई-ऑफिसचा प्रभावी वापर तसेच नागरिक-केंद्रित निर्णय प्रक्रियेवर भर देण्यात आल्याने विभागाला हे यश मिळाले आहे. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जाहीर करण्यात आलेल्या या मूल्यमापनात कार्यालयाची वेबसाईट, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), ब्लॉकचेन तसेच ऋखड तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात झालेला वापर या सात निकषांवर कामगिरी तपासण्यात आली. राज्यात दुसरा क्रमांक मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सर्व विभागप्रमुखांशी संवाद साधून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी अपर विभागीय आयुक्त प्रताप काळे, अपर विभागीय आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर आयुक्त रिता मेत्रेवार, उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे, अपर विभागीय आयुक्त मंजुषा मिसकर, सहआयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, सहआयुक्त राजेश काटकर, उप आयुक्त दादासाहेब वानखेडे, उपआयुक्त सुषमा देसाई, सहायक आयुक्त सरीता सुत्रावे, नगर प्रशासन विभागाचे देविदास टेकाळे, सहायक आयुक्त मंजुषा कापसे, महानगर नियोजनकार हर्षल बावीस्कर, जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी विद्याधर शेळके, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना विभागीय आयुक्त श्री. पापळकर म्हणाले की, १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमामुळे शासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि तंत्रज्ञानाधारित झाले आहे.



## दिंद्रुड येथील पोदार लर्न स्कूलला हंकारे यांचे 'न समजलेले आई बाप' विषयावर विशेष सत्र

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील पोदार लर्न स्कूलला ख्यातनाम व्याख्याते वसंत हंकारे यांचे न समजलेले आईबाप या विषयावर विशेष सत्राचे आयोजन शाळेच्या वतीने मंगळवारी करण्यात आले होते. याप्रसंगी जन्मापासून मुलांना सुजाण नागरिक बनवण्यासाठी धडपडणाऱ्या आई-वडिलांचे ऋण फेडण्यासाठी सदैव तत्पर राहण्याची भावनिक साद हंकारे यांनी विद्यार्थ्यांना घातली.



आधुनिकतेच्या नावाखाली बिघडत चाललेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या वैचारिक जीवनावर हंकारे यांनी भाष्य करत ज्या आई-वडिलांनी बालपणापासून सुजान नागरिक होण्याचे संस्कार केले अशा मुलांनी आपल्या आई-वडिलांच्या नावाला कलंक लागेल असे वागू नये, मुलींनी बापाच्या इज्जतीला डाग न लागण्याचा विचार मनी बाळगावा, मोबाईल चा अतिरेक जीवनात काय दुःख देतो या बाबत सविस्तर विश्लेषण केले. इंटरनेटच्या जमान्यात समाज माध्यमांचा होत असलेला अतिरेक कुटुंब व्यवस्था उध्वस्त करणारा ठरत आहे, आई-वडिलांचे पाल्याशी असलेले नाते बिघडण्याचे सर्वात मोठे कारण हे माध्यम ठरत असल्याची खंत सुप्रसिद्ध व्याख्याते वसंत हंकारे यांनी व्यक्त केली. या विशेष सत्राच्या अध्यक्षस्थानी पोदार लर्न स्कूलचे अध्यक्ष अतुल ठोंबरेंसह, बंडू खांडेकर, राहुल ठोंबरे,माजी पंचायत समिती सदस्या सुरेखा ठोंबरे,माजी सरपंच ज्योती ठोंबरे,दिंद्रुड पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, प्रकाश काशिद, संतोष स्वामी, नागेश वकरे, नितीन वाघमोडे, गणेश काटकर, नवनाथ कांबळे, ज्ञानोबा कटारे विद्यालयाचे प्राचार्य निलेश निंदाणे आदी मान्यवर उपस्थित होते.सुत्रसंचलन बिभीषण बडे यांनी तर आभार राजेंद्र पांडे यांनी मानले.

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७९०/२०२६**

**कुशिवर्ता व इतर वि. निरंक**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः (१) कुशिवर्ता भ्र. निवासराव उर्फ नेवासराव सारुक, वय- ५० वर्षे, धंदा-घरकाम, रा. च-हाटा, ता. जि. बीड २) संदिप पि. निवासराव उर्फ नेवासराव सारुक, वय-२६ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर. ३) प्रदिप पि. निवासराव उर्फ नेवसराव सारुक . वय-२५ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर ४) संगम पि. निवासराव उर्फ नेवसराव सारुक, वय-१९ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर ५) गणपती पि. साहेबा सारुक, वय-८० वर्षे, धंदा-शेती, रा. सदर

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे निवासराव उर्फ नेवासराव पि.गणपती सारुक हे दिनांक ३०/०४/२०१३ रोजी मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र. ५ हे मयताचे वडील आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे निवासराव उर्फ नेवासराव पि.गणपती सारुक यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत निवासराव उर्फ नेवासराव पि. गणपती सारुक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख २६/०२/२०२६ आहे.**

आज दिनांक २०/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ जी. एम. केकान यांच्यामार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

**शिक्का** — **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १९७८/२०२५**

**गंगाबाई विरूध्द निरंक**

**अर्जदार – १. गंगाबाई भ्र. बालाप्रसाद कासट, वय – ५८ वर्षे, धंदा– घरकाम, रा. विप्रनगर, ब्राम्हणवाडी, बीड ता.जि. बीड. २. दिपक पि. बालाप्रसाद कासाट, वय– ३७ वर्षे, धंदा अकाउंटट, रा. सदर, ३. सोनाली भ्र. हरिभाउ झंवर, वय – ३९ वर्षे, धंदा – घरकाम, रा. आझाद चौक, सेंट्रल हनुमान, लातुर ता.जि. लातुर**

विरुध्द निरंक

मागणी– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत मदनलाल पि. दगडुलाल कासट यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत मदनलाल पि. दगडुलाल कासट यांचा मृत्यु दिनांक २३/११/२००० रोजी झाला आहे. वरील अर्जदार क्र. १ ते ३ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत मदनलाल पि. दगडुलाल कासट यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार क्र. १ ते ३ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत मदनलाल पि. दगडुलाल कासट यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २३/०२/२०२६ आहे.**

**(अॅड. डि. एम रोटे यांच्यामार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

**शिक्का** — **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक
# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ ●

## पाटोदयात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय भावपूर्ण श्रद्धांजली ; उपस्थितांना अश्रू अनावर



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा नगरपंचायत कार्यालयासमोर पाटोद्यातील सर्वपक्षीय नेते, विविध पक्षांचे तालुकाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी आणि पत्रकार यांच्या वतीने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी संपूर्ण पाटोदा तालुक्यात अत्यंत शोकाकुल वातावरण पाहायला मिळाले.नेत्यांच्या डोळ्यांत दाटले अश्रू श्रद्धांजली सभेदरम्यान उपस्थितांच्या भावनांचा बांध फुटला. नगरसेवक संतोष दादा जाधव आणि मौलाना हे आपल्या भावना व्यक्त करताना अत्यंत भावूक झाले, त्यांना अश्रू अनावर झाले होते. अजित दादांच्या आठवणीने संपूर्ण परिसर हेलावून गेला होता.मान्यवरांनी व्यक्त केल्या शोकसंवेदना दीपक दादा घुमरे (तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस): अजितदादा म्हणजे आमचा खंबीर आधारवड होते. शब्दाला जागणारा आणि विकासाचा ध्यास घेतलेला असा लोकनेता पुन्हा होणे अशक्य आहे. आज संपूर्ण महाराष्ट्राने एक धडाडीचे नेतृत्व गमावले असून ही पोकळी कधीही भरून निघणार नाही. त्यांच्या जाण्याने आमचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे.भूषण जाधव (राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार गट) राजकीय मतभेद जरी असले,तरी अजितदादांच्या कामाची पद्धत आणि प्रशासनावरील त्यांची पकड ही नेहमीच ▶▶ उर्वरित पान २ वर

# अजितदादांच्या निधनाने राज्य शोकसागरात

## बीड न.प.मध्ये मात्र 22 कोटींच्या टेंडरची घाई

### भाजप युवा नेते ॲड.नागेश तांबारे यांचा गंभीर आरोप

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात सर्वत्र अजितदादांच्या निधनामुळे शोककळा पसरलेली असताना बीड नगरपरिषदेत मात्र सत्ताधाऱ्यांचे वेगळेच गणित सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. बारामतीमध्ये अंत्यविधी सुरु असतानाच बीडमध्ये उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांच्यासह अधिकाऱ्यांनी २२ कोटी रुपयांच्या टेंडरसाठी बैठक घेतली असल्याचा गंभीर आरोप भाजपचे युवा नेते ॲड.नागेश तांबारे यांनी केला आहे. त्यांनी पत्रकात पुढे म्हटले की, बीड नगरपरिषदेत बैठक पार पडली. या बैठकीला नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, मुख्याधिकारी शैलेश फडसे, किरण देशमुख यांच्यासह इतर अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. मात्र, या बैठकीचा विषय आणि वेळ ही असंवेदनशीलता दर्शविणारी आहे. एकीकडे संपूर्ण राज्य अजितदादा पवार यांच्या निधनामुळे शोकसागरात बुडालेले असताना, बीड नगरपरिषदेत मात्र कोट्यवधी रुपयांच्या टेंडरची घाई का? ही बैठक इतकी तातडीची होती का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. २२ कोटी रुपयांच्या कामांसाठी आधीच नियोजनबद्ध हालचाली सुरू आहेत. सामान्य नागरिकांच्या भावनांना काहीच किंमत दिली जात नाही. ही असंवेदनशीलता आणि सत्तेची हाव दाखवणारी बाब आहे. 'शोककाळातही टेंडर राजकारण थांबत नाही' हे निंदनीय आणि निषेधार्ह असल्याची टीका ॲड. तांबारे यांनी केली आहे. तसेच, ज्यांनी खुर्चीवर बसविले त्यांचाच विसर इतक्या लवकर पडावा, हे दुर्दैवी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध वाळू उपसा करणारे आयशर पकडले

**बीड । प्रतिनिधी**

पिंपळनेर पोलीसांनी प्रभावी कारवाई करून आयशर कंपनीचा टेम्पो व वाळू असा एकूण अंदाजे रु. २०,१०,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. दिनांक २८/०१/२०२६ रोजी रात्री ०१.१० वाजण्याच्या सुमारास, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. मधुसूदन घुगे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नाथापुर शिवारातील सिंदफना नदी पात्रातून अवैधरीत्या वाळू उपसा करून तिची चोरटी वाहतूक व




विक्री केली जात आहे. सदर माहितीच्या आधारे पोलीस पथकाने पंचासह नाथापुर गावाजवळील सिंदफना नदी पुलाजवळ सापळा रचला. दरम्यान, संशयास्पद पिवळ्या रंगाचा आयशर कंपनीचा टेम्पो (MH23 AU 5190) थांबवून तपासणी केली असता, टेम्पोमध्ये अंदाजे दोन ब्रास वाळू आढळून आली. टेम्पो चालकाने आपले नाव आकाश मधुकर लांडगे (वय ३४ वर्षे, रा. गुंदा, ता. जि. बीड) असे सांगितले. वाळू वाहतुकीबाबत परवाना अथवा रॉयल्टी बाबत विचारणा केली असता, कोणतेही वैध कागदपत्र नसल्याचे निष्पन्न झाले. सदर कारवाईत आयशर कंपनीचा Pro 2095xpt मॉडेलचा टेम्पो (अंदाजे किंमत रु. २०,००,०००/-) व वाळू (अंदाजे किंमत रु. १०,०००/-) असा एकूण रु. २०,१०,०००/- चा ▶▶ उर्वरित पान २ वर


## अंबाजोगाईत 1 फेब्रुवारी रोजी मोफत बाल हृदयरोग, 2-डी इको व कलर डॉपलर तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर

### घुगे हार्ट ॲण्ड क्रिटीकल केअर हॉस्पिटल व रोटरी क्लबचा उपक्रम : डॉ.नवनाथ घुगे यांची माहिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील घुगे हार्ट ॲण्ड क्रिटीकल केअर हॉस्पिटल व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी ,आय.एम.ए. महाराष्ट्र राज्य, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम महाराष्ट्र शासन व लिटल हार्ट केअर हॉस्पिटल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १ फेब्रुवारी रविवारी सकाळी ९ ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत घुगे हार्ट ण्ड क्रिटीकल केअर हॉस्पिटल, प्रशांत नगर, अंबाजोगाई येथे, बाल हृदयरोग, २-डी इको व कलर डॉपलर मोफत तपासणी व गरजू रुग्णाची शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजक हृदयरोग तज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे यांनी दिली. अंबाजोगाई शहरात घुगे हार्ट ण्ड क्रिटीकल केअर हॉस्पिटल व रोटरी क्लब यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून बालकांची मोफत २-डी इको व कलर डॉपलर तपासणी करून या द्वारे आत्ता पर्यंत १४० बालकांच्या मोफत हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.अंबाजोगाई, केज, परळी, धारूर, माजलगाव, कळंब, तालुक्यातील अनेक बालरुग्ण या शिबिराच्या माध्यमातून दुरुस्त झाले. आगामी काळात अशा बालकांना मोफत उपचार उपलब्ध करुन अंबाजोगाई शहरात रविवारी १ फेब्रुवारी रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ नवनाथ घुगे, पुणे येथील लहान बालकांचे हृदयरोग तज्ज्ञ डॉ.पंकज सुगावकर हे रुग्णांची तपासणी करतील. ज्या रुग्णांना हृदय शास्त्रक्रिया आवश्यक असेल त्यांची मोफत शास्त्रक्रिया करण्याची सोय करण्यात येणार आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## धनंजय मुंडेंच्या नावाने फेसबुकवर बनावट खाते काढणे पडणार महागात, सायबर पोलिस ठोकणार बेड्या




### फेसबुकवर धनंजय मुंडेंच्या नावाने बनावट खाते काढून आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या विरोधात फिर्याद दाखल

**बीड । प्रतिनिधी**

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नावाने फेसबुक या सोशल मीडिया साईटवर खोटे अकाउंट काढून त्यावरून आक्षेपार्ह पोस्ट करण्यात आल्याने धनंजय मुंडे यांच्या वतीने संबंधित फेक अकाउंट विरोधात रीतसर कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे. संबंधित फेक खाते काढणाऱ्या व्यक्तीस आता ही चांगलेच महागात पडणार असून, सायबर पोलिस संबंधितास गुन्हा दाखल करून बेड्या ठोकणार आहेत.

धनंजय मुंडे हे सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असतात, मात्र त्यांच्या नावाने फेसबुकवर (उ्हरपरक्षरू र्चींपवश) खोटे अकाउंट काढून त्यावरून काही आक्षेपार्ह पोस्ट करण्यात आल्याने बीड सायबर पोलिसात धनंजय मुंडे यांच्या सूचनेवरून स्वीय सहाय्यक तथा खाजगी जनसंपर्क अधिकारी सुदर्शन (सुधीर) सांगळे यांनी रीतसर फिर्याद दिली आहे. सदर फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात येणार असून संबंधितास अटक करण्यासाठी पुढील तपास सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्री. निलेश केळे करीत आहेत.

धनंजय मुंडे यांनी याबाबत बीडचे पोलिस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांच्याशी देखील संपर्क करून कडक कारवाई ▶▶ उर्वरित पान २ वर

## पाटोदा-मांजरसुंबा महामार्गावर अपघातांची साखळी कायम

### जाधववस्ती जवळ ट्रक-दुचाकीचा भीषण अपघात ; संतोष कागदे यांचा जागीच मृत्यू

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील मांजरसुंबा ते पाटोदा महामार्गावर अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसून आज दि.२८ बुधवार रोजी सायंकाळी सव्वा ७ वाजता जाधववस्ती परिसरात ट्रक व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू



झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## तहसील बीड व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्या संयुक्त विद्यमाने आपदा मित्र-सखी प्रशिक्षण कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

तहसील कार्यालय, बीड व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (छऊठऋ), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आपदा मित्र-सखी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण ११ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून, आपत्ती व्यवस्थापन, प्राथमिक बचाव कार्य, आपत्कालीन परिस्थितीत मदत व जनजागृती यासंबंधी महत्त्वाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी स्वयंच्छेने सहभागी होऊ इच्छिणारे खेळाडु, शिक्षक, कर्मचारी, समोदशक गृह रक्षक दलाचे सदस्य, सेवाभावी संस्था, तरुण मंडळे, बचाव गटांचे सदस्य यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण हे पूर्णतः स्वयंसेवी स्वरुपाचे असून, प्रशिक्षणार्थींना कोणताही मोबदला दिला जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. आपत्तीच्या वेळी समाजासाठी मदतीस तत्पर राहण्यासाठी हे

## महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने उत्कृष्ट संपादक म्हणून माजलगावचे परमेश्वर सोळंके मूकनायक पुरस्कार जाहीर

**माजलगाव । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे महाराष्ट्र पत्रकार संघ गेवराई यांचा वतीने मूकनायक पुरस्काराचे वितरण केले जाते त्याप्रमाणे यावर्षी उत्कृष्ट संपादक म्हणून माजलगाव तालुक्यातील बीड लोकरंजन चे मुख्य संपादक परमेश्वर सोळंके यांना यावर्षीचा मूकनायक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बापूसाहेब हुंबरे तथा माजलगाव तालुका अध्यक्ष संतोष रासवे व बालासाहेब उफाडे



यांनी सांगितले. महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते त्याप्रमाणे यावर्षी महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महत्वपूर्ण लोकांचा सन्मान करण्यात येणार आहे यामध्ये माजलगाव तालुक्यातून बीड लोकरंजन चे मुख्य संपादक परमेश्वर सोळंके यांची उत्कृष्ट संपादक म्हणून महाराष्ट्र पत्रकार संघाने निवड केली आहे दिनांक ३ फेब्रुवारी रोजी सदरील पुरस्काराचे वितरण गेवराई येथील ▶▶ उर्वरित पान २ वर

## द्वारकाधीश मित्र मंडळाचा विक्रमी उपक्रम; ९० कोटींचे मिळणार आरोग्य कवच

### तीन दिवसात १८०० लाभार्थींना आयुष्मान कार्डचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

गरीब आणि मध्यम वर्गीयांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयुष्मान भारत योजना सुरु केली. ही योजना प्रत्येक गरजवंतापर्यंत पोहचवण्यासाठी द्वारकाधीश मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री परशुराम (भैय्या) गुरखुदे व सागर देशपांडे यांनी पुढाकार घेत तीन दिवसात १८०० नागरिकांचे आयुष्मान भारत कार्ड काढत ९०



कोटी रुपयांचे आरोग्य कवच देत विक्रमी उपक्रम केल्याने नागरिकात समाधान व्यक्त केले जात आहे. द्वारकाधीश मित्र मंडळाचे श्री परशुरामभैय्या व नगरसेवक जगदीश गुरखुदे आणि सौ.भाग्यश्री सागर देशपांडे यांच्या वतीने गरीब आणि मध्यमवर्गीयांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयुष्मान भारत योजना चे मोफत नोंदणी व कार्ड वाटप ▶▶ उर्वरित पान २ वर

## व्यक्तिमत्व विकास घडविण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते : प्राचार्या माहेश्वरी गावित



### बाबूजी आव्हाड महाविद्यालयाच्या एनएसएस हिवाळी शिबिरास मढी येथे प्रारंभ

**मढी । प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या चिन्हामधील निळा रंग म्हणजे मानवतेचे प्रतीक, लाल रंग म्हणजे ऊर्जा व चैतन्याचे प्रतीक तर बोधवाक्यामध्ये समाजाचा व पर्यावरणाचा विचार करण्यात आला आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबिर म्हणजे विचारांचे भांडार असून ते व्यक्तिमत्व विकास प्रगल्भ करण्याचे महत्त्वाचे ठिकाण आहे.आपण समाज व निसर्गासाठी काहीतरी देणे लागतो ही भावना प्रत्येकाने अंगीकारल्यास समाजात सकारात्मक बदल होण्यास वेळ लागत नाही. समाजसेवेसाठी दिवसाचे काही मिनिटे जरी खर्च केली तरी त्यातून होणारे परिवर्तन खूप मोठे असते. हे समाजसेवेचे बीज प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये रुजविण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते असे प्रतिपादन पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले. त्या बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मढी येथील विशेष हिवाळी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे तर व्यासपीठावर कानिफनाथ देवस्थानच्या विश्वस्त उषा मरकड, प्रदीप पाखरे, दादासाहेब बडे, एनएसएस विभागप्रमुख डॉ अरुण राख, प्रा. आनंद घोंगडे, डॉ वैशाली आहेर, डॉ अशोक कानडे, डॉ विजय देशमुख, डॉ अशोक डोळस आदी उपस्थित होते. डॉ गावित पुढे म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी एनएसएस शिबिरातून वेगवेगळी कौशल्य आत्मसात करावी. एआय च्या जगात शिक्षकांची भूमिका वाढली असून समाजभिमुख विद्यार्थी शिक्षकांना अपेक्षित आहेत.लोकमान्य टिळकांनी मृत्यू हा अंतिम सत्य आहे हे अधोरेखित ▶▶ उर्वरित पान २ वर